## परीक्षा व मुल्यांकन पद्धतीत झालेले महत्त्वपूर्ण बदल

फेब्रुवारी २०१२ पासून परीक्षा व उत्तरपत्रिका मूल्यमापन पद्धतीमध्ये अमूलाग्र बदल करण्यात येत आहे. प्रत्येक विषयांच्या परीक्षेत एक प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचा असणार आहे व प्रत्येक विषयांच्या परीक्षेत विद्यार्थ्यांचे केवळ गुणदान करुन उत्तरपत्रिकेचे मूल्यमापन न करता विद्यार्थ्यांच्या विषयातील विविध कौशल्याचे (उदा. भाषा विषयासाठी व्याकरण, शुद्धलेखन, गद्य आकलन, काव्य आकलन, लेखन कौशल्य इ.) मूल्यमापन करुन त्यास त्या कौशल्यासाठी श्रेणी देण्यात येणार आहे. (A - Excellent, B - Best, C - Good, D - Need Improvement) विद्यार्थ्यास प्रमाणपत्रासोबत या श्रेणी व मिळालेल्या गुणांचे गुणपत्रक दिले जाणार आहे. यापुढे परीक्षार्थीची त्या विषयाच्या प्रत्येक भागात किती तयारी आहे हे विद्यार्थी / शिक्षक, पालक यांना समजणार आहे. नवीन पद्धती विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस पोषक ठरणार आहे. सर्व शाळांना निश्चित लाभ होईल.

## इंग्रजी व संस्कृत परीक्षा बाबत

फेब्रु. २०१२ च्या सत्रात संस्कृत व इंग्रजी विषयांच्या परीक्षा विद्यापीठाने नव्याने तयार केलेल्या पुस्तकावर आधारित असतील. इंग्रजी विषयाच्या ४ परीक्षांऐवजी इयत्तावर ६ परीक्षा घेण्यात येणार आहेत. संस्कृत साठी सर्व परीक्षेसाठी स्वतंत्र पुस्तके असून इंग्रजीच्या इ. ५वी व ६वी, ७वी व ८वी व ९वी व १०वी साठी अशी ३ पुस्तके तयार करण्यात आली आहेत. इंग्रजी विषयाचा पाया पक्का व्हावा. मागील परीक्षेचा संदर्भ उपलब्ध व्हावा. वारंवार उजळणी व्हावी या हेतून दोन परीक्षांसाठी एक पुस्तक तयार केले आहे. ही पुस्तके विद्यार्थी व शिक्षक/पालकांसाठी नक्कीच लोकप्रिय ठरतील. ही सर्व पुस्तके त्वरीत उपलब्ध व्हावीत पुणे येथील उज्वल ग्रंथ भांडाराबरोबरच विविध विभागीय कार्यालयातही विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

## फेब्रुवारी २०१२ सत्रातील परीक्षा कार्यक्रम

| **विषय** | **विषय** (वेळ – स. १० ते १) | **विषय** (वेळ – दु. २ ते ५) |
|---|---|---|
| रविवार दि. २९ जानेवारी २०१२ | संस्कृत | FFCE |
| रविवार दि. ०५ फेब्रुवारी २०१२ | विज्ञान | SLCIT |
| रविवार दि. १२ फेब्रुवारी २०१२ | इंग्रजी | इंग्रजी संभाषण, इंग्रजी लेखन कौशल्य |
| रविवार दि. १९ फेब्रुवारी २०१२ | गणित | नृत्यकला (लेखी परीक्षा – मध्यमा, पदविका) |
| रविवार दि. २६ फेब्रुवारी २०१२ | मराठी | मराठी पाठांतर / मराठी लेखन कौशल्य |

**नृत्यकला प्रात्यक्षिक परीक्षेचा कार्यक्रम परीक्षेस नाव नोंदणी करणा–या केंद्रांना नंतर कळविण्यात येईल.**

# प्रास्ताविक

शालेय स्तरावरील इ. ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी तसेच इंग्रजी, गणित, विज्ञान इ. विषयांच्या अभ्यासाचा त्यांचा पाया पक्का व्हावा या हेतूने टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे दरवर्षी इंग्रजी, गणित, विज्ञान, संस्कृत, मराठी भाषा इत्यादी विषयांच्या परीक्षा वर्षातून फेब्रुवारी/सप्टेंबर या महिन्यांत घेतल्या जातात. तळागाळातील सर्वांना शिक्षण मिळावे. शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन व्हावे या उद्‌देशाने विद्यापीठ या परीक्षांचे आयोजन करीत असते. या परीक्षांचा अभ्यासक्रम शासनाने तयार केलेल्या शालेय अभ्यासक्रमास उपयुक्त व पूरक असल्याने या परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय झालेल्या आहेत. शाळांमधील परीक्षांच्या गुणवत्ता यादीत येण्यासाठी या परीक्षांचा अभ्यास प्रेरक ठरला आहे. **शालान्त परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या या परीक्षांचा उपयोग शालान्त परीक्षेच्या तयारीसाठी झाल्याचे अभिमानाने नमूद केलेले आहे. गेली अनेक वर्षे शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याचे काम या परीक्षांच्या माध्यमातून विद्यापीठ करीत आहे.**

विद्यापीठ नियमित विषयांच्या परीक्षांबरोबर संगणकाच्या On Line धर्तीवर SLCIT (School Level Course In Information Techonology) परीक्षा व स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर FFCE (Foundation For Competitive Exam) या परीक्षांचे आयोजन करीत आहे. भविष्यातील व्यावसायिक शिक्षण पद्धतीला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी अशा परीक्षांची तोंडओळख व्हावी याच उद्‌देशाने विद्यापीठाने या परीक्षा घेण्याचे ठरविले आहे. या परीक्षांचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा. या दृष्टीने सर्व शाळांनी प्रयत्न करावे. या परीक्षांबाबत सविस्तर माहिती पुढे दिलेली आहे.

# शालेय परीक्षांची वैशिष्ट्ये

१. दरवर्षी महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेरील सुमारे २००० पेक्षा जास्त शाळांमधून दोन लाख विद्यार्थी विद्यापीठाच्या शालेय परीक्षांना बसतात. विविध विषयांच्या इ. ५वी ते १०वीसाठी जवळपास ६० परीक्षा वर्षातून दोन सत्रांत घेतल्या जातात.

२. विविध विषयांच्या प्रत्येक परीक्षांमध्ये गुणानुक्रमे पहिल्या दोन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके व विशेष प्रमाणपत्रे देण्यात येतात. तसेच सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जातात. सर्व विषयांच्या प्रत्येक परीक्षेस प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करणा–या विषय शिक्षकांना विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

३. परीक्षा व्यवस्थेसाठी होणारा खर्च नियमाप्रमाणे शाळांना (केंद्रांना) दिला जातो. त्यामुळे या परीक्षा शाळेत सुरू केल्यास शाळेला कोणताही आर्थिक बोजा सहन करावा लागत नाही.

४. **या परीक्षांसाठी मार्गदर्शन करणाऱ्या शाळेतील अध्यापकांना परीक्षा शुल्काचे २५% इतकी रक्कम अध्यापक–मानधन म्हणून दिली जाते.**

५. या परीक्षांचा फायदा शहरी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घेता यावा तसेच या परीक्षांची माहिती अध्यापकांना व विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार अध्यापक मेळावे आयोजित केले जातात.

६. शाळांना तत्पर सेवा उपलब्ध व्हावी यासाठी निवडक जिल्हयांमध्ये विभागीय कार्यालय व विद्यापीठाच्या शाखा सुरू केल्या आहेत.

७. नियमित विषयांच्या परीक्षांबरोबरच सध्याच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची तोंड ओळख होण्यासाठी School Level Course In Information Techonology परीक्षा व Foundation For Competitive Exam या परीक्षांचे आयोजन.

# अत्यंत महत्त्वाच्या सूचना

विद्यापीठातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेण्यात येतात. त्या संदर्भात काही महत्त्वाच्या सूचना खालीलप्रमाणे – प्रत्येक विषयाच्या परीक्षेस किमान २० विद्यार्थी असतील तरच त्या शाळेस परीक्षा केंद्र दिले जाते. ज्या शाळांमधून या परीक्षा घेतल्या जात नाहीत अशा शाळेतील विद्यार्थ्यांना नजिकच्या विभागीय कार्यालयात/विद्यापीठात बहिस्थ विद्यार्थी म्हणून परीक्षा देता येईल. २० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असूनही परीक्षा केंद्र मागणी करणा–या शाळेस परीक्षा केंद्र दिले जाईल मात्र शुल्कातील केंद्र खर्च व अध्यापक मानधन दिले जाणार नाही. त्यांना संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

## नवीन केंद्र व केंद्र क्रमांक

१. शाळेला नवीन केंद्र सुरू करावयाचे असल्यास त्यांनी विद्यार्थ्यांच्या नावांच्या यादीबरोबरच खाली दिलेल्या मुद्याप्रमाणे केंद्र सुरू करण्यासाठीचे विनंतिपत्र द्यावे. अगोदर केंद्र परवानगीचे मंजुरी पत्र पाठविण्याची गरज नाही. ते विद्यार्थी यादीबरोबरच पाठवावे. संबंधित शाळेस परीक्षेच्या अगोदर विद्यार्थ्यांच्या परीक्षांच्या आसन क्रमांकांच्या यादीबरोबरच केंद्र क्रमांक कळविण्यात येईल. त्यानंतर पुढील सर्व परीक्षांसाठी तोच केंद्र क्रमांक कायम राहील.

   **केंद्र सुरू करण्यासाठीच्या अर्जाचे मुद्दे** – शाळेचे नाव – पूर्ण पत्ता ( मु.पो.,ता. जि., पिन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई.मेल आय डी.) – शाळा (केंद्र) संचालक/मुख्याध्यापकांचे संपूर्ण नाव – शाळेची एकूण विद्यार्थी संख्या – शाळेचे माध्यम –(प्राथमिक, माध्यमिक) – गावात नियमित टपाल मिळते का? (पोस्ट/कुरीयर)– शाळेत संगणक लॅब आहे का? शाळेतील संगणकांची संख्या किती आहे? शाळेत संगणक शिक्षक – शाळेत संगणक लॅनमध्ये जोडले आहेत का? (संगणकाची आवश्यकता केवळ (SLCIT) या परीक्षेसाठी )

२. विद्यापीठाने दिलेला कायमचा केंद्र क्रमांक प्रत्येक यादीवर व पत्रव्यवहारावर लिहावा. प्रत्येक परीक्षेसाठी त्या शाळेला एकच केंद्र क्रमांक राहील. परीक्षा शुल्काच्या डी.डी. च्या मागे कायमचा केंद्र क्रमांक व शाळेचे नाव घालावे.

## शुल्क व यादी पाठविताना

१. विविध परीक्षांसाठी विद्यार्थ्यांच्या नावांची यादी पाठविताना पुढे दिलेल्या तक्त्याप्रमाणे यादी तयार करून योग्य त्या शुल्कासह पाठवावी. संगणकावार एम. एस. ऑफिस एक्सेल शीटमध्ये यादी तयार करून एक हार्ड कॉपी (प्रिंट यादी) व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) पाठवावी. किंवा विभागाच्या E-mail: shaleyaprasar@yahoo.com यावर Attachment मध्ये यादी पाठवावी. यापुढे जलद संपर्कासाठी मेलचा वापर केला जाणार आहे. आपणही आपला पत्रव्यवहार ई–मेल आयडीद्वारे करावा.

**यादीसाठीचा मजकूर पुढील मुद्दयानुसार असावा**

शाळेचे नाव –शाळेचा पूर्ण पत्ता, पीन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई–मेल आय डी. –परीक्षेचा विषय व परीक्षेचे नाव – परीक्षा कोड क्र.– [ ][ ][ ] (शुल्क तक्त्यावर पहावा) केंद्र क्र. –[ ][ ][ ][ ][ ] विषय शिक्षकाचे नाव, इयत्तेनुसार वेगळे शिक्षक असल्यास त्याप्रमाणे नाव कळवावे – शाळा माध्यम – मराठी/इंग्रजी/हिंदी

| अनु क्र. | आडनाव | प्रथम नाव | वडिलांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | फाटक | रमेश | रामचंद्र | ६ वी |

इंग्रजी यादी याच मुद्याप्रमाणे पाठवावी.

२. विद्यार्थ्यांच्या नावांच्या याद्या (संगणकाद्वारे टंकलेखित केलेल्या) संस्कृत व मराठी विषयासाठी मराठीतून व इतर विषयांसाठी इंग्रजीतूनच (Capital Letters Only) पाठवाव्यात. आपली शाळा इंग्रजी माध्यम किंवा मराठी माध्यम आहे याचा स्पष्ट उल्लेख यादीत असावा.

**शुल्काबाबत**

शुल्काच्या हिशोबात सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने सुटसुटीत शुल्काचा तक्ता तयार केला आहे.(शुल्क तक्ता पहावा) त्यानुसार **शाळांनी विभागीय कार्यालयाच्या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन टपाल/कुरीयरचा खर्च वाचवावा.** नमुन्याप्रमाणे यादी पाठविताना त्यासोबत सर्व परीक्षांच्या एकत्रित किंवा प्रत्येक विषयाचा स्वतंत्र (शाळेच्या सोयीप्रमाणे) शुल्काचा हिशोब खाली दिलेल्या मुद्दयांप्रमाणे करून पाठवावा.

शाळेचे नाव –शाळेचा पूर्ण पत्ता, पिन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई–मेल इ. – परीक्षेचे नाव –

परीक्षा कोड क्र.– [ ][ ][ ] केंद्र क्र. – [ ][ ][ ][ ][ ] मार्गदर्शक शिक्षकाचे नाव –

| **परीक्षा कोड** | **विषय** | **विद्यार्थिसंख्या X शुल्क *** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| २१ | इंग्रजी | ५० X २५ | १२५० |
| ४२ | गणित | ७५ X २८ | २१०० |
| ११ | संस्कृत | २५ X १९ | ४७५ |
| | | एकूण | ३८२५ |

* शुल्क तक्ता रकाना ३ प्रमाणे विद्यापीठाकडे पाठविण्याची एकूण रक्कम – रु. ३८२५/–

बँकेचे नाव : डी.डी. नं. व दिनांक :

मुख्याध्यापक : स्वाक्षरी /शिक्का

**शुल्क पाठविताना घ्यावयाची काळजी :**

१. शुल्क पाठविताना कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्ट मा. कार्यवाह, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या नावाने काढून याद्यांसोबत विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागाकडे पाठवावा. डी.डी. व्यतिरिक्त आपण यूको बँकेच्या विद्यापीठाच्या खाते क्र. १६८४०१००००६१११ व बँक ऑफ महाराष्ट्रचा खाते क्र. २००२७०५२४६१ मध्ये स्थानिक बँकेच्या शाखेमधून मनी ट्रान्सफर ने शुल्क जमा करता येईल.

२. मनी ट्रान्सफर ने बँकेत पैसे भरल्याच्या मूळ पावतीची एक झेरॉक्स आपणाजवळ ठेवावी व मूळ पावती याद्यांसोबत

शुल्काच्या तपशिलासह विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागाकडे पाठवावी. शुल्क भरल्याची पावती असेल तरच याद्या स्वीकारल्या जातील. **मनीऑर्डर स्वीकारली जाणार नाही**.

३. विद्यापीठात सोमवार ते शुक्रवार स. ११ ते १ व १.३० ते ४.३० वाजेपर्यंत समक्ष याद्या व रोख शुल्क स्वीकारले जाईल. विभागीय कार्यालयात याद्या व शुल्क स्वीकारण्याच्या वेळेसाठी त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

**परीक्षेपूर्वी व परीक्षेनंतर**

१. यादी प्राप्त झाल्यानंतर विषयवार परीक्षांप्रमाणे प्रत्येक केंद्रांना विद्यार्थ्यांच्या आसन क्रमांकांची यादी (उपस्थिती पत्रक) व आवश्यक त्या उत्तरपत्रिका (प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका एकच असते) परीक्षेपूर्वी किमान ५ दिवस आधी विद्यापीठाकडून/विभागीय कार्यालयाकडून शाळांना वितरित केल्या जातात. त्यातील स्**वतंत्र पाकीटात असलेली आसन क्रमांकाची यादी आपण पाठविलेल्या यादीप्रमाणे बरोबर असल्याची परीक्षेपूर्वी खात्री करून घ्यावी. सर्व परीक्षा विद्यापीठाने निश्चित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच घ्याव्यात.**

३. उपस्थितिपत्रकावर परीक्षेस उपस्थित असणा–या विद्यार्थ्याची त्याच्या नावापुढे सही घ्यावी. उपस्थितिपत्रकामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये. यादीत नाव नसल्यास तसेच परीक्षेस ऐनवेळी बसणा–या विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व परीक्षा शुल्क विलंब शुल्कासहित उत्तरपत्रिकेबरोबरच पाठवावे. सदर विद्यार्थ्यांस त्या परीक्षेतील शेवटचा आसन क्रमांक देऊन त्यापुढे A/B/C असे लिहावे. उदा. शेवटचा आसन क्र. १०१ असल्यास त्यापुढील ऐनवेळच्या पहिल्या विद्यार्थ्यास १०१ A दुस–या विद्यार्थ्यास १०१ B या प्रमाणे आसन क्र. द्यावेत. आसन क्रमांकाच्या यादीतील नावांमध्ये काही दुरूस्त्या असल्यास उपस्थितिपत्रकावर संबंधित नावाला/शब्दाला/अक्षराला लाल पेनने गोल करून सुधारणा करावी किंवा स्वतंत्र कागदावर आसन क्रमांकासह चुकीचे नाव व त्यापुढे सुधारित नाव अशी यादी पाठवावी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या नावावरच प्रमाणपत्र दिली जातात त्यामुळे विषय शिक्षकांनी नावात चूक राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. परीक्षा झाल्यानंतर दुस–याच दिवशी परीक्षेच्या उत्तरपत्रिका व उपस्थितिपत्रक समक्ष, टपालाद्वारे किंवा कुरिअरने विद्यापीठाकडे/विभागीय केंद्राकडे पाठवव्यात. उत्तरपत्रिका एस.टी. पार्सलने पाठवू नये.

५. परीक्षा निर्णयाबाबत व प्रमाणपत्राबाबत काही शंका असल्यास निर्णय जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांपर्यंत विद्यापीठाच्या शालेय परीक्षा विभागाकडे संपर्क साधावा. परीक्षा निर्णयानंतर पुढील परीक्षेपूर्वी उत्तरपत्रिका निर्लेखित केल्या जातात.

६. परीक्षा निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून २० दिवसांच्या आत उत्तरपत्रिकांचे पुनर्निरीक्षणासंबंधीचे अर्ज मुख्याध्यापक, केंद्रसंचालक यांच्यामार्फत स्वीकारण्यात येतात. प्रत्येक उत्तरपत्रिकेसाठी रु. २०/– याप्रमाणे पुनर्निरीक्षण शुल्क अर्जासोबत पाठवावे लागते. डुप्लिकेट प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी ३०/– रुपये शुल्क आकारण्यात येते.

वरील सर्व सूचनांची नोंद घ्यावी व परीक्षेबाबत विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

**– कार्यवाह**

# परीक्षा शुल्क तक्ता

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ *△ रूपये | कॉलम २ ** रूपये | कॉलम ३ *** रूपये |
|---|---|---|---|---|
| | **एस.एल.सी.आय.टी. परीक्षा (मराठी व इंग्रजी माध्यम)** | | | |
| ०१ | SLCIT Level 1 इ. ५वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २८.०० | ७२.०० |
| ०२ | SLCIT Level 2 इ. ६वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २८.०० | ७२.०० |
| ०३ | SLCIT Level 3 इ. ७वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २८.०० | ७२.०० |
| ०४ | SLCIT Level 4 इ. ८वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २८.०० | ७२.०० |
| ०५ | SLCIT Level 5 इ. ९वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २८.०० | ७२.०० |
| ०६ | SLCIT Level 6 इ. १०वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २८.०० | ७२.०० |
| | **संस्कृत** | | | |
| ११ | संस्कृतभाषाप्रारम्भः (प्रथमा) इ.५वी (तोंडी) | २८.०० | ९.०० | १९.०० |
| १२ | संस्कृतभाषाप्रवेशः (द्वितीया) इ.६वी | ३२.०० | १०.०० | २२.०० |
| १३ | संस्कृतभाषापरिचयः (तृतीया) इ. ७ वी | ३६.०० | ११.०० | २५.०० |
| १४ | संस्कृतभाषाजिज्ञासा (चतुर्थी) इ. ८ वी | ४०.०० | १२.०० | २८.०० |
| १५ | संस्कृतभाषारसास्वादः (पंचमी) इ. ९ वी | ४४.०० | १३.०० | ३१.०० |
| १६ | संस्कृतभाषाभिज्ञः (षष्ठी) इ. १० वी | ४८.०० | १४.०० | ३४.०० |
| | **इंग्रजी** | | | |
| २१ | इंग्रजी प्री-एलिमेंटरी इ. ५वी | ३६.०० | ११.०० | २५.०० |
| २२ | इंग्रजी एलिमेंटरी इ.६वी | ४०.०० | १२.०० | २८.०० |
| २३ | इंग्रजी इंटरमिडीएट इ.७वी | ४४.०० | १३.०० | ३१.०० |
| २४ | इंग्रजी ज्युनियर इ. ८वी | ४८.०० | १४.०० | ३४.०० |
| २५ | इंग्रजी सिनीयर इ. ९ वी | ५२.०० | १५.०० | ३७.०० |
| २६ | इंग्रजी ॲडव्हांस इ. १० वी | ५६.०० | १६.०० | ४०.०० |
| | **मराठी उच्चस्तर** | | | |
| ३१ | मराठी उच्चस्तर पहिली इ.५वी ते ७वी | ३६.०० | ११.०० | २५.०० |
| ३२ | मराठी उच्चस्तर दुसरी इ.८वी | ४०.०० | १२.०० | २८.०० |
| ३३ | मराठी उच्चस्तर तिसरी इ.९वी | ४४.०० | १३.०० | ३१.०० |
| ३४ | मराठी उच्चस्तर चौथी इ.१०वी | ४८.०० | १४.०० | ३४.०० |

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ * रूपये | कॉलम २ ** रूपये | कॉलम ३ *** रूपये |
|---|---|---|---|---|
| | **मराठी निम्नस्तर** | | | |
| ३५ | मराठी निम्नस्तर पहिली इ.५वी व ६वी | ३६.०० | ११.०० | २५.०० |
| ३६ | मराठी निम्नस्तर दुसरी इ.७वी व ८वी | ४०.०० | १२.०० | २८.०० |
| ३७ | मराठी निम्नस्तर तिसरी इ.९वी | ४४.०० | १३.०० | ३१.०० |
| ३८ | मराठी निम्नस्तर चौथी इ.१०वी | ४८.०० | १४.०० | ३४.०० |
| | **गणित** | | | |
| ४१ | गणित प्रवेश इ. ४थी | ३६.०० | ११.०० | २५.०० |
| ४२ | गणित पहिली इ.५वी | ४०.०० | १२.०० | २८.०० |
| ४३ | गणित दुसरी इ. ६वी | ४४.०० | १३.०० | ३१.०० |
| ४४ | गणित तिसरी इ. ७वी | ४८.०० | १४.०० | ३४.०० |
| ४५ | गणित चौथी इ. ८वी | ५२.०० | १५.०० | ३७.०० |
| ४६ | गणित पाचवी इ. ९वी (फक्त फेब्रु. सत्रात) | ५६.०० | १६.०० | ४०.०० |
| ४७ | गणित सहावी इ. १०वी (फक्त फेब्रु. सत्रात) | ६०.०० | १७.०० | ४३.०० |
| ४८ | सा. गणित पाचवी इ.९वी (फक्त फेब्रु. सत्रात) | ५६.०० | १६.०० | ४०.०० |
| ४९ | सा. गणित सहावी इ.१०वी (फक्त फेब्रु. सत्रात) | ६०.०० | १७.०० | ४३.०० |
| | **विज्ञान (फक्त फेब्रु. सत्रात)** | | | |
| ५१ | विज्ञान परीक्षा पहिली इ. ५वी | ३६.०० | ११.०० | २५.०० |
| ५२ | विज्ञान परीक्षा दुसरी इ. ६वी | ४०.०० | १२.०० | २८.०० |
| ५३ | विज्ञान परीक्षा तिसरी इ. ७वी | ४४.०० | १३.०० | ३१.०० |
| ५४ | विज्ञान परीक्षा चौथी इ. ८वी | ४८.०० | १४.०० | ३४.०० |
| ५५ | विज्ञान परीक्षा पाचवी इ. ९वी | ५२.०० | १५.०० | ३७.०० |
| ५६ | विज्ञान परीक्षा सहावी इ. १०वी | ५६.०० | १६.०० | ४०.०० |
| | **इंग्रजी संभाषण** | | | |
| ६१ | इंग्रजी संभाषण पहिली तोंडी परीक्षा इ.५वी | २८.०० | ९.०० | १९.०० |
| ६२ | इंग्रजी संभाषण दुसरी तोंडी परीक्षा इ.६वी | ३२.०० | १०.०० | २२.०० |
| ६३ | इंग्रजी संभाषण तिसरी तोंडी परीक्षा इ.७वी | ३६.०० | ११.०० | २५.०० |
| | **मराठी पाठांतर** | | | |
| ७० | मराठी पाठांतर पहिली तोंडी परीक्षा इ.५वी | २८.०० | ९.०० | १९.०० |
| ७१ | मराठी पाठांतर दुसरी तोंडी परीक्षा इ.६वी | ३२.०० | १०.०० | २२.०० |
| ७२ | मराठी पाठांतर तिसरी तोंडी परीक्षा इ.७वी | ३६.०० | ११.०० | २५.०० |

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ ✻ रूपये | कॉलम २ ✻✻ रूपये | कॉलम ३ ✻✻✻ रूपये |
|---|---|---|---|---|
| | **मराठी लेखन कौशल्य** | | | |
| ७३ | मराठी पहिली परीक्षा इ. ५वी व ६वी | २८.०० | ९.०० | १९.०० |
| ७४ | मराठी दुसरी परीक्षा इ. ७वी व ८वी | ३२.०० | १०.०० | २२.०० |
| | **इंग्रजी लेखन कौशल्य** | | | |
| ७५ | इंग्रजी पहिली परीक्षा इ. ५वी व ६वी | २८.०० | ९.०० | १९.०० |
| ७६ | इंग्रजी दुसरी परीक्षा इ. ७वी व ८वी | ३२.०० | १०.०० | २२.०० |
| | **नृत्यकला भरतनाटयम्** | | | |
| ८१ | प्रारंभिक (प्रात्यक्षिक) | १६०.०० | ४५.०० | ११५.०० |
| ८२ | प्रगत (प्रात्यक्षिक) | २१०.०० | ६०.०० | १५०.०० |
| ८३ | मध्यमा (लेखी व प्रात्यक्षिक) | २६०.०० | ७५.०० | १८५.०० |
| ८४ | पदविका (लेखी व प्रात्यक्षिक) | ३१०.०० | ९०.०० | २२०.०० |
| | **नृत्यकला कथक** | | | |
| ९१ | प्रारंभिक (प्रात्यक्षिक) | १६०.०० | ४५.०० | ११५.०० |
| ९२ | प्रगत (प्रात्यक्षिक) | २१०.०० | ६०.०० | १५०.०० |
| ९३ | मध्यमा (लेखी व प्रात्यक्षिक) | २६०.०० | ७५.०० | १८५.०० |
| ९४ | पदविका (लेखी व प्रात्यक्षिक) | ३१०.०० | ९०.०० | २२०.०० |
| | **फाऊंडेशन फॉर कॉंपिटेटीव्ह एक्झाम** | | | |
| १०१ | FFCE Level 1 इ. ५वी व ६वी च्या अभ्यासक्रमावर | ७५.०० | २१.०० | ५४.०० |
| १०२ | FFCE Level 2 इ. ७वी व ८वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २८.०० | ७२.०० |
| १०३ | FFCE Level 3 इ. ९वी व १०वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २८.०० | ७२.०० |

**शुल्काचा हिशोब :** ✻ कॉलम १: △परीक्षा शुल्क + रु. ४ नोंदणी शुल्क = विद्यार्थ्यांकडून घ्यावयाची रक्कम

✻✻ कॉलम २ : केंद्रास द्यावयाची रक्कम = नोंदणी शुल्क रु.२ + केंद्र खर्च रु. १ + अध्यापक मानधन २५% △(परीक्षा शुल्काच्या)

✻✻✻ कॉलम ३ : विद्यापीठाकडे पाठवायची रक्कम = कॉलम १ − कॉलम २

**टिप :** मुदतीनंतर शुल्क पाठविल्यास प्रत्येक विद्यार्थ्यांस रु. ५ व नृत्यकलेच्या विद्यार्थ्यांस रु. २० विलंब शुल्क आकारले जाईल. ते कॉलम ३ मध्ये एकत्रित करुन पाठवावे. नृत्यकला विषया व्यतिरीक्त सर्व परीक्षा १०० गुणांच्या असतील.

आपल्या शंका, सूचना, तक्रारी यांचे जलद निवारण करण्यासाठी खालील संबंधित व्यक्तिंशी संपर्क साधावा.

• **विभागप्रमुख –** राजीव देशपांडे – ९८२३०४५७७९ • **गणित –** सारिका तांबे– ९९७५१९२७६५, • **मराठी, संस्कृत, विज्ञान, नृत्यकला, मराठी लेखन कौशल्य, मराठी पाठांतर** – सुचिता भुजबळ – ९९२१६९१९४९, • **इंग्रजी –** पौर्णिमा कुलकर्णी – ९७६५६०४५१८, कैलास लबडे– ९५२७८९८९६२, • **SLCIT, FFCE, On Line** - योगेश सराफ – ९६६५५१०००७ **शुल्काबाबत –**सुषमा खुडे – ९०११९११६७७, **आवक–जावक–** पुरुषोत्तम कुलकर्णी – ९७६५४६०७३९,

# विभागीय कार्यालय

१. शाळांना (केंद्रांना) तत्पर सेवा मिळावी, टपालाद्वारा/कुरीयरने होणारा खर्च, विलंब व अनिश्चितता टाळण्याच्या उद्देशाने काही निवडक जिल्हयांच्या ठिकाणी विद्यापीठाच्या शाखा/विभागीय केंद्र सुरू करण्यात आली आहेत. त्याची सविस्तर माहिती माहितीपुस्तिकेतील मलपृष्ठ क्र. १ वर देण्यात आली आहे.

२. या केंद्रांवर परिसरातील/जिल्हयातील शाळांसाठी खालील सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तरी शाळांनी त्याचा लाभ घ्यावा.

• परीक्षा याद्या व शुल्क स्वीकारणे. • परीक्षा साहित्य शाळांना/ केंद्रांना वितरित करणे. • परीक्षा कालावधीत शाळांना/केंद्रांना भेटी देणे. • परीक्षा झाल्यानंतर शाळांतून/केंद्रांतून येणा–या उत्तरपत्रिका स्वीकारणे. परीक्षांचा निर्णय व उत्तीर्ण विद्यार्थ्यांची प्रमाणपत्र शाळांना वितरीत करणे. • पुस्तक विक्री, विविध मेळावे व कार्यशाळा यांचे आयोजन. • परीक्षांबाबत शाळांच्या शंका, सूचना, तक्रारी सोडविण्यासाठी विद्यापीठाचा प्रतिनिधी म्हणून काम पाहणे.

३. विद्यापीठाच्या शाखा/विभागीय कार्यालयाच्या परिसरातील शाळांनी केंद्रासाठी अथवा परीक्षांच्या सर्व प्रकारच्या कामासाठी पुणे मुख्य कार्यालयाशी संपर्क न साधता त्या जिल्हयातील/परिसरातील विभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा.

४. ज्या केंद्रांच्या जवळपास शाखा/विभागीय कार्यालये नाहीत अशा केंद्रांनी परीक्षांबाबत पुणे कार्यालयाशी संपर्क साधावा.

५. शाखांमधून किंवा विभागीय कार्यालयातून चालणा–या सर्व कामावर तसेच सर्व विषयाच्या परीक्षांवर विद्यापीठाचे संपूर्ण नियंत्रण राहील. विभागीय कार्यालय हे विद्यापीठाचा प्रतिनिधी म्हणून काम करतील. विभागीय कार्यालयांना विद्यापीठाकडून सर्व कामकाजासाठी मानधन दिले जाते. त्यामुळे विद्यापीठ शुल्काव्यतिरीक्त इतर कोणतीही जादाची रक्कम शाळांनी विभागीय कार्यालयास देवू नये. भविष्यात इतरही जिल्हयांमध्ये मागणीनुसार विभागीय कार्यालय सुरू करण्यात येतील.

# मराठी व इंग्रजी माध्यमातून वक्तृत्व स्पर्धा

विद्यापीठातर्फे दरवर्षी लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्ताने मराठी व इंग्रजी माध्यमातून वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व गुण वाढीस लागावेत, विषयाची मांडणी करता यावी, त्याचबरोबर मान्यवर नेत्यांच्या आदर्श जीवन पद्धतीचा अभ्यास व्हावा या हेतूने या स्पर्धा आयोजित केल्या जातात. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांची चरित्रे व कार्य आणि चालू घडामोडींवर आधारित असे विषय स्पर्धेसाठी असतात. या स्पर्धा तीन गटांत घेण्यात येतात. (गट क्र १–इ. ५वी व ६वी, गट क्र २–इ. ७वी व ८वी व गट क्र ३–इ. ९वी व १०वी) पुणे जिल्हयातील शाळांप्रमाणेच या स्पर्धेस इतर जिल्हयांतील शाळाही सहभागी होऊ शकतात. मात्र स्पर्धेस येणासाठी कोणताही प्रवास खर्च दिला जात नाही. स्पर्धेच्या कार्यक्रमाचा तपशील वार्षिक कार्यक्रमामध्ये दिलेला आहे. कृपया, तो पहावा. **स्पर्धेची पारितोषिके– मराठी व इंग्रजी स्पर्धेसाठी प्रत्येक गटास खालीलप्रमाणे रोख पारितोषिके देण्यात येतात.** प्रथम पारितोषिक – रु.१०००/– द्वितीय पारितोषिक – रु.७००/– तृतीय पारितोषिक– रु.५००/– उत्तेजनार्थ पारितोषिक – रु.३००/– विभागून. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येते तसेच सर्व गटांत मिळून जास्तीत जास्त क्रमांक मिळविण्या–या शाळेस सर्वसाधारण विजेतेपद दिले जाते. अशा शाळेस स्मृतिचिन्ह व दुर्मिळ ग्रंथ देऊन गौरविण्यात येते. पुणे प्रमाणेच काही निवडक विभागीय कार्यालयातूनही या स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. याबाबत शाळांनी नजीकच्या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

# परीक्षांचे स्वरूप

**School Level Course In Information Techonology (SLCIT)**
**(एकूण ६ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ०१ ते ०६)**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागातर्फे विद्यार्थ्यांमध्ये संगणकाचे ज्ञान वाढावे हा उद्देशाने सत्र फेब्रुवारी २०११ पासून नव्याने SLCIT ही परीक्षा सुरू केल्या आहोत. सध्याचे युग हे संगणकाचे युग आहे, अनेक क्षेत्रांमध्ये जसे बँकिंग, विमा, पर्यटन, शैक्षणिक, औद्योगिक, कृषी, संरक्षण या क्षेत्रांमध्ये संगणकाने प्रवेश केला आहे. त्यामुळे भविष्यात संगणक येणे गरजेचे असून प्रत्येकाला त्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. भविष्यात या परीक्षांचा फायदा नक्कीच विद्यार्थ्यांना होईल. अगदी सुरुवातीपासूनच म्हणजे एम.एस.सी.आय.टी. च्या परीक्षेपासून सर्व व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांमध्ये संगणक हा अधिक महत्त्वाचा विषय समजला जातो त्यामुळे या परीक्षा त्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

**केंद्रासाठी आवश्यक बाबी :** १) संगणकाचे किमान ज्ञान असणारा मार्गदर्शक (शिक्षक) २) खाली दिलेल्या तपशीलानुसार शाळेकडे किमान ५ संगणक असावेत. ते लॅन ने एकमेकांना जोडलेले असावे. ३) सर्व स्तराच्या (Level) परीक्षांसाठी मिळून किमान ५० विद्यार्थ्यांची नोंदणी होणे आवश्यक आहे. ४) नव्याने केंद्र सुरू केलेल्या शाळांना सुरूवातीच्या काही परीक्षांसाठी त्यांच्या मागणीनुसार लागणारे तांत्रिक सहाय्य पुरविण्यात येईल. ५) परीक्षेस विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यानंतर संबंधित शाळांना नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची आसन क्रमांकानुसार नोंदणीची सीडी दिली जाईल त्यामध्ये परीक्षेबाबतच्या सर्व सूचना व आवश्यक माहिती दिलेली असेल. याबाबतची स्वतंत्र सीडी विभागीय कार्यालयाकडे सुद्धा उपलब्ध असेल. ६) सर्व स्तरातील परीक्षा इयत्तावार शासनाने तयार केलेल्या अभ्यासक्रमावर आधारित असतील. ७) या सर्व परीक्षा शालांत परीक्षा झाल्यानंतर येणा-या रविवारी घेण्यात येतील.

**Setup Requirements (Pre requisites)**

**Server : Hardware -** PIV 2.0 GHz, 512 MB RAM, 52x CD/DVD ROM, 4 GB HDD, 100 MBPS Network Card, Monitor with 1024 X 768 Resolution, Laser Jet Printer (Only records Purpose), UPS (optional), **Software -** OS: MS Windows XP with SP2/SP3, MS Office 2003

**Client : Hardwar -** PIV 1.7 GHz, 256 MB RAM, 2 GB HDD, 100 MBPS Network Card, Monitor with 1024 X 768 Resolution, Laser Jet Printer (Only records Purpose), UPS (optional), **Software -** OS: MS Windows XP with SP2/SP3, MS Office 2003

**संस्कृत**
**(एकूण ६ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ११ ते १६)**

भारतीय संस्कृतीमध्ये सर्वात प्राचीन अशी भाषा म्हणून संस्कृत भाषेचा उल्लेख केला जातो. याच संस्कृतीमध्ये उपलब्ध असणारे प्राचीन ग्रंथ, वेद समजण्यासाठी संस्कृत भाषा समजणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याच्या माध्यमातून संस्कृत विषयाचा पाया मजबूत व्हावा व शालेय विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषेची गोडी निर्माण व्हावी या हेतूने इ. ५वी ते

१०वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी सहा परीक्षा फेब्रुवारी व सप्टेंबर सत्रांत घेतल्या जातात. प्रारभः (प्रथमा) परीक्षा तोंडी स्वरूपाची असते. सर्व परीक्षा १०० गुणांच्या आहेत. संस्कृत अभिज्ञः (षष्ठी) ही परीक्षा फक्त फेब्रुवारी सत्रातच घेतली जाते. या परीक्षांसाठी उपयुक्त अशी पुस्तके विद्यापीठाने तयार केलेली आहेत. फेब्रुवारी २०१२ च्या परीक्षा नव्याने तयार केलेल्या पुस्तकानुसार होतील. नविन पुस्तकाच्या रचनेनुसार परीक्षांच्या नावामध्येही बदल करण्यात आले आहेत. नविन तयार केलेल्या सर्व पुस्तकांची एक भेट प्रत नोंदणी केलेल्या शाळेला पाठविण्यात येईल.

## इंग्रजी
## (एकूण ६ परीक्षा, परीक्षा कोड क्र. २१ ते २६)

प्री–एलिमेंटरी, एलिमेंटरी, इंटरमिडीएट, ज्युनियर, सिनीयर, ॲडव्हांस या परीक्षा इ. ५वी ते १०वी पर्यंतच्या असतात. सर्वसाधारण प्री–एलिमेंटरी ५वीसाठी, एलिमेंटरी ६वी साठी, इंटरमिडीएट ७वी साठी, ज्युनियर ८वी साठी व सिनीयर ९वी साठी व ॲडव्हांस १०वी साठी या इयत्तांचे विद्यार्थी बसू शकतात. १०० गुणांची इंग्रजीची प्रश्नपत्रिका व्याकरणावर आधारित असते. मात्र प्रश्नपत्रिका तयार करताना संबंधित इयत्तांना अपेक्षित असणा–या व्याकरणाचा विचार केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाच्या व्याकरणाचा पाया पक्का तयार होतो. तसेच इंग्रजी सिनीयर व ॲडव्हांस या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप एस.एस.सी. बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेच्या नवीन सुधारित अभ्यासक्रमाप्रमाणे करण्यात आले आहे. इ. ५वी ते १०वी च्या इंग्रजी व्याकरणासाठी उपयुक्त अशी पाठयपुस्तके विद्यापीठाने तयार केलेली आहेत. याचा फायदा/उपयोग विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेविषयी असणारी भिती दूर होवून त्यांच्यातील आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी होईल. तसेच, विद्यार्थ्यांना पाठयपुस्तका व्यतिरीक्त शिक्षण देणे शक्य होईल. **टीप :** फेब्रुवारी २०१२ पासून इंग्रजी विषयांची परीक्षा प्रत्येक इयत्तेनुसार व नविन पुस्तकानुसार घेण्यात येणार आहे. ही सर्व पुस्तके नोंदणी केलेल्या प्रत्येक शाळेला एक भेटप्रत पाठविण्यात आली आहे. ही पुस्तके विभागीय कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

## मराठी
## (एकूण ८ परीक्षा, उच्चस्तर ४, परीक्षा कोड क्र. ३१ ते ३४
## निम्नस्तर ४ परीक्षा कोड क्र. ३५ ते ३८)

मराठी विषयाचा अभ्यास विद्यार्थ्यांकडून व्हावा या उद्दिष्टाने व शालेय अभ्यासाला पूरक अशा मराठी भाषा परीक्षांचे आयोजन केले आहे. मराठी उच्चस्तर पहिली इ. ५वी ते ७वीसाठी, मराठी उच्चस्तर दुसरी इ. ८वीसाठी, मराठी उच्चस्तर तिसरी इ. ९वीसाठी, मराठी उच्चस्तर चौथी इ. १० वीसाठी, मराठी निम्नस्तर पहिली इ. ५वी व ६वीसाठी, मराठी निम्नस्तर दुसरी इ. ७वी व ८वीसाठी, मराठी निम्नस्तर तिसरी इ. ९वीसाठी व मराठी निम्नस्तर चौथी १० वीसाठी अशी इयत्तावार विभागणी आहे. विद्यार्थ्यांची मराठी भाषेच्या व्याकरणाची तयारी चांगल्या रीतीने व्हावी यासाठी या परीक्षा सुरू केल्या आहेत.

## गणित
## (एकूण ९ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ४१ ते ४९)

इ. ४थी ते इ. १०वीपर्यंत इयत्तांच्या शालेय अभ्यासक्रमावर आधारित प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांत पायाभूत गणितासंबंधीच्या प्रश्नापासून काही आव्हानात्मक प्रश्नापर्यंत सर्व समावेशकता असते. प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न सक्तीचे असतात. याशिवाय सामाईक प्रवेश परीक्षांची (CET) पूर्वतयारी म्हणून एक प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचा असतो. इ.९वी व १०वीसाठी सामान्य गणित भाग एक व सामान्य गणित भाग दोन यांसाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका असतात. इ. ४थी ते १०वीसाठी एकूण १०० गुणांची परीक्षा असते. (उदा. इ.९वी बीजगणित ५० गुण, भूमिती ५० गुण) इ. ९वी व १० वी साठीच्या गणित पाचवी व सहावी या परीक्षा फक्त फेब्रुवारी सत्रातच घेतल्या जातात.

## विज्ञान
## (एकूण ६ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ५१ ते ५६)

इ. ५वी ते इ. १०वी साठी शासनाच्या विज्ञान विषयाच्या पुस्तकावर प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र परीक्षा घेण्यात येतात. (इ. ९वी व १०वी इयत्तांसाठी भाग १ व २ अशा प्रत्येकी ५० गुणांच्या प्रश्नपत्रिका असतात.) या परीक्षा फक्त फेब्रुवारी सत्रातच घेतल्या जातात.

## मराठी पाठांतर
## (एकूण ३ परीक्षा फक्त तोंडी– प्रत्येकी १०० गुण, परीक्षा कोड क्र. ७० ते ७२)

विद्यार्थ्यांची पाठांतराची तयारी चांगल्या रीतीने व्हावी म्हणून या परीक्षांची योजना तयार केलेली आहे. ही परीक्षा शाळांनी शुद्धता, पाठांतर, पठन पद्धती, अर्थ, परिणाम कारकता या मुद्दयांच्या आधारे ध्यावयाची असून विद्यार्थ्यांची गुणपत्रके विद्यापीठाकडे पाठवावयाची असतात. या परीक्षेचा अभ्यासक्रम मराठी पाठांतर भाग १, २,३ मध्ये सविस्तर दिला आहे.

## इंग्रजी संभाषण
## (एकूण ३ परीक्षा फक्त तोंडी– प्रत्येकी १०० गुण, परीक्षा कोड क्र. ६१ ते ६३)

ही परीक्षा शाळांनी शुद्धता, पाठांतर, पठन पद्धती, अर्थ, परिणामकारकता या मुद्दयांच्या आधारे ध्यावयाची असून विद्यार्थ्यांची गुणपत्रके विद्यापीठाकडे पाठवावयाची असतात.

## मराठी लेखन कौशल्य
## (एकूण २ परीक्षा, परीक्षा कोड क्र. ७३ व ७४)

इ. ५वी व ६वीसाठी मराठी लेखन कौशल्य पहिली परीक्षा व इ.७वी व ८वीसाठी मराठी लेखन कौशल्य दुसरी

परीक्षा घेतली जाते. या परीक्षांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

**इ. ५वी व ६वी (गुण १००, वेळ ३ तास) :**

निबंध (वर्णनात्मक) – १० गुण, निबंध (शब्दचित्र, व्यक्ती, प्राणी, वस्तू) – १० गुण, चित्रवर्णन– १० गुण, प्रसंगानुसार कसे वागाल– ८ गुण, अपूर्ण कथा पूर्ण करा– १० गुण, सुविचारानुसार उदाहरणे– ७ गुण, तुमच्यावर सोपविलेले काम– ८ गुण, संवाद लिहा–१० गुण, शुध्द शब्दांची निवड– १० गुण, हिंदी व इंग्रजी भाषांतर–१० गुण, शुद्धलेखन ७ गुण.

**इ. ७वी व ८वी (गुण १००, वेळ ३ तास) :**

निबंध (वर्णनात्मक)– १० गुण, आत्मवृत्त– १० गुण, अनुभव– १० गुण, संवाद– १० गुण, सुविचारांचा अर्थ लिहा– १० गुण, अपुर्ण कथा पुर्ण करा– १० गुण, प्रसंगानुसार कसे वागाल– ५ गुण, विचारांबद्दल तुमचे मत– ५ गुण, शुद्ध शब्दांची निवड– १० गुण, शुद्धलेखन– १० गुण, इंग्रजी अनुवाद करा– १० गुण.

## English Writing Skill
## (Total 2 Exams, Exam. code 75 & 76 )

इ. ५वी व ६वी साठी इंग्रजी लेखन कौशल्य पहिली परीक्षा व इ.७वी व ८वी साठी इंग्रजी लेखन कौशल्य दुसरी परीक्षा घेतली जाते.

**Std 5th & 6th (Total 100 marks,Time 3 hrs) :**

Write relating word - similar word - opposite words- complete sentence - match words to meaning sentences - answer the question in general nature - look at the picture and write 10 sentences - make proper order of the sentences and re-write - tense - use proper punctuation marks - read the paragraph and complete the diagram - complete dialogue on given topic

Note : Each question contains 5 marks.

**Std 7th & 8th (Total 100 marks,Time 3 hrs) :**

Vocalablary/word base exercise - complete, match, correct sentences - question answer general in nature - tenses - punctuation marks - proper sequence of sentences and re-write - use proper words to build given paragraph -letter writing (formal and informal) - conversation, write dialogue - read given paragraph and complete a tree diagram - read table/graph and write paragraph - essay writing - report writing Note : Each question contains 10 marks.

## नृत्यकला
## (भरतनाट्यम् एकूण ४ परीक्षा, कथक एकूण ४ परीक्षा)

या परीक्षांच्या स्वतंत्र माहिती पुस्तिका अभ्यासक्रम व मार्गदर्शनपर पुस्तिका स्वतंत्र तयार करण्यात आल्या असून त्या मागणीनुसार उपलब्ध होतील.

### भरतनाट्यम्/कथक

| | | |
|---|---|---|
| प्रारंभिक | – | १०० गुण (प्रात्यक्षिक ६० गुण, तोंडी ३० गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण), |
| प्रगत | – | १५० गुण (प्रात्यक्षिक १०० गुण, तोंडी ४० गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण), |
| मध्यमा | – | २०० गुण (लेखी ५० गुण, प्रात्यक्षिक १४० गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण), |
| पदविका | – | २५० गुण (लेखी ७५ गुण, प्रात्यक्षिक १६५ गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण) |

## (Foundation For Competitive Examination)
## (एकूण ३ परीक्षा, परीक्षा कोड क्र. १०१ ते १०३)

स्पर्धेच्या युगात करीअर घडविण्यासाठी IIT, AIEEE, MPSC, UPSC, इ. सारख्या अनेक परीक्षांची तयारी करावी लागते. शालेय जीवनात त्याची पुरेशी माहिती व सराव नसल्याने क्षमता असूनही अडचण येते आणि विद्यार्थी मागे पडतात.

अशा परीक्षांची माहिती व सराव सुरूवातीपासून होऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागावा व स्पर्धा परीक्षांचे हे आव्हान सहजतेने पेलता यावे. यासाठी तसेच असंख्य शाळा व पालकांच्या मागणीवरून टिळक महाराष्ट्र विद्यापीठ सन २०१०–११ पासून स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर Foundation For Competitive Examination (FFCE) या परीक्षांचे आयोजन करीत आहे. तीन स्तरांवर होणा–या या परीक्षांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल. स्तर पहिला (इ.५वी व ६वी च्या अभ्यासक्रमावर आधारित), स्तर दुसरा (इ.७वी व ८वी च्या अभ्यासक्रमावर आधारित), स्तर तिसरा (इ.९वी व १०वी च्या अभ्यासक्रमावर आधारित). १०० गुणांसाठी ९० मिनिटांत १० ० प्रश्न असून सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचे असतील. चालू अभ्यासक्रमाशी सुसंगत तथापि कोणत्याही एका विषयावर आधारित परीक्षेचे स्वरूप न राहता गणित, मराठी, विज्ञान, इंग्रजी, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, मानसिक क्षमता, सामान्यज्ञान इ. विषयांचा चालू घडामोडींवर परामर्ष घेण्यात येईल. तयारीसाठी स्वतंत्र संदर्भ पुस्तके परीक्षा शुल्कातच प्रत्येक विद्यार्थ्यास, परीक्षेसाठी उपलब्ध करून दिली जातील.

या परीक्षा भविष्यातील स्पर्धा परीक्षांच्या सरावासाठी असल्याने विद्यार्थ्यांना कोणत्याही स्तराच्या परीक्षेस व कितीही वेळा बसता येईल.

## शालेय प्रसार परीक्षा पुस्तकांची यादी

१. संस्कृतभाषाप्रारम्भः
२. संस्कृतभाषाप्रवेशः
३. संस्कृतभाषापरिचयः
४. संस्कृतभाषाजिज्ञासा
५. संस्कृतभाषारसास्वादः
६. संस्कृतभाषाभिज्ञः
७. लोकमान्य इंग्लिश ग्रामर व कॉम्पोझीशन पुस्तक १ ले (इंग्रजी प्री–एलिमेंटरी व एलिमेंटरी परीक्षेसाठी)
८. लोकमान्य इंग्लिश ग्रामर व कॉम्पोझीशन पुस्तक २ रे (इंग्रजी इंटरमिडीएट व ज्युनियर परीक्षेसाठी)
९. लोकमान्य इंग्लिश ग्रामर व कॉम्पोझीशन पुस्तक ३ रे (इंग्रजी सिनीयर व अ‍ॅडव्हांस परीक्षेसाठी)
११. मराठी पाठांतर भाग १, २, ३
१२. इंग्रजी संभाषण भाग १, २, ३
१३. नृत्यकला अभ्यासक्रम मार्गदर्शक पुस्तिका

**वरील सर्व पुस्तके खालील ठिकाणी उपलब्ध आहेत**
**विविध विभागीय कार्यालय तसेच उज्ज्वल ग्रंथ भांडार / रवीन्दु बुक सेलर्स**
**६८३ बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक,पुणे ३० फोन नं. ९९७५५८४३२२, २४४६२२६८**

- शालेय परीक्षांचे जुने प्रश्नसंच अत्यल्प किमतीत वरील ठिकाणी उपलब्ध आहेत.
- वरील पुस्तकांच्या किमान १० प्रती घेतल्यास पुस्तकाचे छापील किमतीवर शे. १५% कमिशन देण्यात येते.
- पुस्तक मागणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयास दूरध्वनीवरुन संपर्क साधावा.

---

## -परिपत्रके-

विद्यापीठात घेत असलेल्या शालेय स्तरावरील विविध परीक्षा या अभ्यासक्रमाला पूरक अशा असल्याने व त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी होत असल्याने जास्तीत जास्त शाळांनी या परीक्षांचे केंद्र आपल्या प्रशालेत उघडून विद्यार्थ्यांना या परीक्षांना बसवावे, अशा आशयाची परिपत्रके खाली नमूद केलेल्या जिल्ह्याच्या मा. शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांनी त्यांच्या कक्षांतील शाळांसाठी काढलेली आहेत.

| | नाव | पत्र क्रमांक |
|---|---|---|
| १. | मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जालना | जा.क्र. जिपजा/शिक्षण/मा.वि.२/८३ कार्यालय जि.प.जालना दि.४/८/८३ |
| २. | मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, उपसंचालक, पुणे | जा.क्र. माध्य(१४) पीआरटी शिक्षण |
| ३. | मा. शिक्षणाधिकारी, जि. परिषद, पुणे | जा.क्र. शिक्षण खाते/माध्य.१०/८४ दि. ११/९/८४ |
| ४. | मा. शिक्षणाधिकारी, जि. परिषद, औरंगाबाद | दि. ७/१२/८३ |
| ५. | मा. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई म.न.पा. शिक्षण विभाग ९८–२३४७ | जा.क्र. ओओसी/१३२९ दि. १३/८/८७ क्र. मा. वि. ३/९ |
| ६. | मा. शिक्षणाधिकारी, जि. प. बीड शिक्षण विभाग | दि. १०/७/९७ |

# परीक्षा कार्यक्रम

## फेब्रुवारी सत्र

| | | |
|---|---|---|
| शुल्कासह यादी स्वीकारणे | – | सोमवार, दि. २६ डिसेंबर २०११ पर्यंत |
| विलंब शुल्कासह | – | सोमवार, दि. ९ जानेवारी २०१२ |
| परीक्षा दिनांक | – | २९ जानेवारी व फेब्रुवारी महिन्यातील सर्व रविवार |
| निकाल दिनांक – | – | एप्रिल महिन्यातील शेवटचा आठवडा |

## वक्तृत्व स्पर्धा (मराठी व इंग्रजी)

| | | |
|---|---|---|
| नाव नोंदणी तारीख | – | दि. १० जुलै २०१२ पर्यंत, |
| स्पर्धा दिनांक | – | जुलै २०१२, दुसरा किंवा तिसरी आठवडा |
| स्पर्धा ठिकाण | – | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे ३७ |
| पारितोषिक वितरण | – | तिथीने लोकमान्य टिळक पुण्यतिथी |
| पारितोषिक वितरण ठिकाण | – | लो. टिळक पुतळा, महात्मा फुले मंडई, पुणे<br>हस्ते – पुणे महानगरपालिकेचे महापौर) |

**सुचना :** शालेय प्रसार परीक्षा विभागाचा हा परीक्षा व वक्तृत्व स्पर्धेचा कार्यक्रम आहे. यामध्ये आवश्यकतेनुसार बदल केले जातील. याबाबतची माहिती Website: www.tmv.edu.in यावर उपलब्ध असेल. अधिक माहितीसाठी विद्यापीठामध्ये संपर्क साधावा.

# पारितोषिके

- शालेय स्तरावरील संस्कृत, मराठी, इंग्रजी, विज्ञान व गणित या विषयांच्या सर्वपरीक्षांमध्ये सर्व विद्यार्थ्यांमधून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणा–या विद्यार्थ्यांस अनुक्रमे रु. २००/– व रु. १००/– रोख पारितोषिक व विशेष प्रमाणपत्र देण्यात येते.
- –विषयांमधील प्रत्येक परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या विषय शिक्षकास प्रशंसाप्रमाणपत्र देऊन सन्मानित केले जाते.
- सर्व विषयांत मिळून प्रत्येक सत्रास ५०० पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षेस बसविणा–या शाळांना भेटवस्तू व प्रशंसाप्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.
- वक्तृत्व स्पर्धेस प्रथम क्रमांकास रु.१०००/– द्वितीय क्रमांकास रु. ७००/– तृतीय क्रमांकास रु. ५००/– व उत्तेजनार्थ रु. ३००/– रोख पारितोषिक दिले जाते.

**विशेष महत्त्वाच्या सूचना :** फेब्रुवारी २०१२ सत्रापासून इंग्रजी व संस्कृत विषयांच्या पुस्तकांमध्ये बदल करण्यात येणार असून या विषयांची नव्याने तयार केलेली पुस्तके सर्व नोंदणी केलेल्या केंद्रांना भेटप्रत म्हणून पाठवित आहोत. त्याअनुषंगाने फेब्रुवारी २०१२ मध्ये होणा–या परीक्षा या बदललेल्या पुस्तकानुसार होतील. तसेच सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपामध्येही बदल करण्यात आला असून प्रत्येक विद्यार्थ्यासाठी त्या विषयासंदर्भात स्वतंत्र मुल्यमापन पध्दती विकसीत करण्यात येत आहे. तरी कृपया सर्व केंद्रप्रमुखांनी या बदलाची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी विद्यापीठ अथवा विविध विभागीय कार्यालयासाठी संपर्क साधावा.

**सन्न फेब्रुवारी २०११ मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेत बसविणा-या खालील शाळांचा भेटवस्तू व प्रमाणपत्र देवून गौरवविण्यात आले.**

| अनु क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | रोझरी हायस्कूल, कॅम्प, पुणे | ९९७ |
| २. | विद्याधाम प्रशाला, घोडनदी, शिरुर, पुणे | ७८४ |
| ३. | जयहिंद हायस्कूल. धुळे | ७२७ |
| ४. | ग. ज. वर्तक हायस्कूल, मुंबई | ६५३ |
| ५. | राजा शिवाजी विद्यामंदिर, ठाणे | ६०७ |
| ६. | डी.ई.एस. प्रायमरी स्कूल, टिळक रोड, पुणे | ६०० |
| ७. | उषाराजे हायस्कूल, राजारामपूरी, कोल्हापूर | ५८४ |
| ८. | महात्मा गांधी विद्यालय, राजगुरुनगर, पुणे | ५८३ |
| ९. | हि.गो. श्रॉफ हायस्कूल, नंदूरबार | ५६६ |
| १०. | श्री. स्वामी नारायण गुरुकुल, खुराद, जळगाव | ५६५ |
| ११. | गोदावरी हिंदी विद्यालय, चिंचवड, पुणे | ५६४ |
| १२. | श्री. ए. के. नॅशनल हायस्कूल, खांमगाव, बुलढाणा | ५३३ |
| १३. | प्रेरणा विद्यालय, निगडी, पुणे | ५२७ |
| १४. | न. ह. रांका हायस्कूल, बोधवड, जळगाव | ५२६ |

**सन्न सप्टेंबर २०१२ मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेत बसविणा-या खालील शाळांचा भेटवस्तू व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात येणार आहे.**

| अनु क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | श्रीपतराव भोसले हायस्कूल, उस्मानाबाद | १३७३ |
| २. | श्री. छत्रपती शिवाजी राजे माध्यमिक विद्यालय, चिंचवड, पुणे | ८४७ |
| ३. | राजा शिवाजी विद्यामंदिर, ठाणे | ६४९ |
| ४. | जी. जी. पटवर्धन इंग्लिश मिडीयम स्कूल, रत्नागिरी | ५६८ |
| ५. | एम. एस. एस. हायस्कूल, चिंचवड, पुणे | ४६२ |
| ६. | समर्थ विद्या मंदिर, साकिनाका, मुंबई | ४६७ |
| ७. | प्रायव्हेट हायस्कूल, कोल्हापूर | ४०९ |

# सत्र - सप्टेंबर २०११ मध्ये झालेल्या परीक्षांमध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थी यादी व प्रथम क्रमांकास मार्गदर्शन केल्याबद्दल प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येणा-या शिक्षकांची यादी

| क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | शाळेचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| संस्कृत द्वितीया | | | |
| १ | गिते अपर्णा | शेठ ईश्वरचंद हरिदास भाटीया हायस्कूल, कुर्ला मुंबई<br>शिक्षक- शाळेकडून नाव उपलब्ध झाले नाही | ९६ |
| २ | पोखरकर नूतन | श्री दिगंबर सराफ विद्यालय, संगमनेर, अहमदनगर | ९५ |
| संस्कृत तृतीया | | | |
| १ | बकरे भक्ती | प्रि. इंदूमतीदेवी हायस्कूल फॉर गर्ल्स, कोल्हापूर<br>शिक्षक - मा. वर्षा सामंत | ९८ |
| २ | पाटील ऋतूजा | नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालय, जळगाव | ९६ |
| संस्कृत चतुर्थी | | | |
| १ | मरगज सायली | कै. द्वारकाबाई नाईक विद्यालय, कुळगाव, ठाणे<br>शिक्षक - मा. नीरज दांडेकर | ८५ |
| २ | ढमाले पायल | हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूल-माध्य.विभाग,पिंपरी,पुणे | ८२ |
| संस्कृत पंचमी | | | |
| १ | पंडित पंकजकुमार | पुणे शहर बहिस्थ, पुणे<br>बहिस्थ विद्यार्थी | ९३ |
| २ | कुलकर्णी पुष्पा | एम.एस.एस. हायस्कूल, चिंचवड, पुणे | ८६ |
| इंग्रजी प्री-एलिमेंटरी | | | |
| १ | डोंगरे अरींदम | शिशु मंदिर, खोपोली, रायगड,<br>शिक्षक - मा. कुरले | ९७ |
| २ | पडवळ अदिती | श्रीपतराव भोसले हायस्कूल, उस्मानाबाद | ९६ |
| इंग्रजी एलिमेंटरी | | | |
| १ | कडारे शर्वरी | प्रताप विद्या मंदिर, चोपडा, जळगाव<br>शिक्षक - मा पी.व्ही. जोशी | ९७ |
| २ | जांभळे धनश्री | इस्लामपूर हायस्कूल, इस्लामपूर, सांगली | ९४ |
| इंग्रजी ज्युनिअर | | | |
| १ | जोशी अशुतोष | सिटी हायस्कूल, गावभाग, सांगली<br>शिक्षक - मा. ए.डी. खताळ | ९३ |
| २ | कुलकर्णी वेदांगी | एम. आर. सारडा कन्या विद्या मंदिर, नाशिक | ९१ |
| इंग्रजी सिनीअर | | | |
| १ | टाकळकर उत्कर्षा | महाराष्ट्र हायस्कूल, शिवाजी पेठ, कोल्हापूर<br>शिक्षक - मा. दिनकर भोसले | ९७ |
| २ | सोलंखे ज्ञानेश्वरी | महाराष्ट्र हायस्कूल, शिवाजी पेठ, कोल्हापूर | ९४ |

| क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | शाळचे नाव | गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| **मराठी उच्चस्तर पहिली** | | | |
| १ | कासार मानसी | आनंदीबाई बंकट मुलींचे हायस्कूल, चाळीसगाव, जळगाव<br>शिक्षक- मा. राजपूत | ९० |
| २ | सपकाळे भाविका | मुलींचे आगरकर हायस्कूल, सोमवार पेठ, पुणे | ८५ |
| **मराठी उच्चस्तर दुसरी** | | | |
| १ | पवार अंकिता | शिशु विहार माध्य. विद्यालय, कल्याण, ठाणे<br>शिक्षक- मा. जयश्री नास्ते | ८६ |
| २ | मेस्त्री स्वप्नाली | माध्यमिक विद्यामंदिर, मु.कानेडी, पो. सांगवे, जि. सिंधुदुर्ग | ८५ |
| **मराठी उच्चस्तर तिसरी** | | | |
| १ | चौडीय शुभम | जयभवानी विद्यामंदिर व ज्युनि. कॉलेज, औरंगाबाद<br>शिक्षक - मा. एल. डी. गुरखे | ९४ |
| २ | खरात प्राची | जागृती हायस्कूल, बन्सीलाल नगर, औरंगाबाद | ९० |
| **मराठी उच्चस्तर चौथी** | | | |
| १ | पाटील चैताली | डॉ. काकासाहेब पूर्णपात्रे विद्यालय, चाळीसगाव, जळगाव<br>शिक्षक - मा. रेखा वाघमारे | ९७ |
| २ | सोनवणे नुतन | अण्णासाहेब वैशंपायन विद्यालय, नाशिक | ९६ |
| **गणित प्रवेश** | | | |
| १ | पाटील श्रेयस | नु.म.वि. मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे<br>शिक्षक - मा. मंगला टाकळीकर | ९९ |
| २ | गरुड विशाल | सेंट्रल रेल्वे प्रा. शाळा, (म. माध्यम) मनमाड, नाशिक | ९८ |
| **गणित पहिली** | | | |
| १ | पवार श्रेया | कै. ग.रा. पुरोहीत गर्ल्स हायस्कूल, राजवाडा, सांगली<br>शिक्षक - मा. प्रदीप कोरते | ९९ |
| २ | शिंपी जिग्नेश | सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूल, उद्यमनगर, रत्नागिरी | ९८ |
| **गणित दुसरी** | | | |
| १ | वाघ मानसी | शारदा मंदिर कन्या प्रशाला, औरंगाबाद<br>शिक्षक - उज्वला व्यवहारे | १०० |
| २ | कोंडेदेशमुख पुष्पक | एन.जी. पाटील माध्य. विद्यालय, उदली, जळगाव | ९८ |
| **गणित तिसरी** | | | |
| १ | चौगुले शर्वरी | कै. ग. रा. पुरोहीत गर्ल्स हायस्कूल, राजवाडा, सांगली<br>शिक्षक - मा. दिलीप संकपाळ | १०० |
| २ | रसाळ श्रावणी | उषाराजे हायस्कूल, राजारामपूरी, कोल्हापूर | ९९ |
| **गणित चौथी** | | | |
| १ | पाटील हेमलता | संत मीरा विद्यालय, सिडको, औरंगाबाद<br>शिक्षक - मा. टी. एम. सांगडे | ९९ |
| २ | धामणकर आकांक्षा | श्री पद्मावती विद्या मंदिर, उरसे, पुणे | ९८ |